PRGI REGISTRATIION NO. MHAR/26/A4298

# मेट्रो रायगड

METRO RAIGARH

| Vol. No... 1 | Issue No. 5 | 2th JULY, 2026 | Price Rs. 5/- | Annual Subscription Rs. 500

BREAKING घडामोडी

## चेंबूरमध्ये शाळेच्या बसवर झाड कोसळले

**। मुंबई ।** चेंबूर परिसरात मंगळवारी (दि. ३०) शाळेतून घरी परतणाऱ्या विद्यार्थ्यांच्या बसवर अचानक मोठे झाड कोसळून भीषण अपघात झाला. या दुर्घटनेत काही विद्यार्थी गंभीर जखमी झाले असून, एका विद्यार्थ्याला बसमधून बाहेर काढण्यासाठी बचावकार्य सुरू आहे. अग्निशमन दल आणि आपत्कालीन पथके घटनास्थळी दाखल झाली असून, जखमी विद्यार्थ्यांना तातडीने जवळच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

## उपसभापतीपदी सचिन अहिर बिनविरोध

**। मुंबई ।** शिंदेंच्या शिवसेनेकडून सचिन अहिर यांना विधान परिषदेच्या उपसभापतीपदाची उमेदवारी देण्यात आली होती. त्यांच्या विरोधात ठाकरेंकडून उमेदवार दिला गेला होता. पण, त्याने माघार घेतल्यानंतर सचिन अहिर यांची आवाजी मतदानाने बिनविरोध निवड झाल्याचं जाहीर करण्यात आलं. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवारसुद्धा उपस्थित होत्या. शिंदे गटाकडून सचिन अहिर, तर ठाकरे गटाकडून जगन्नाथ अभ्यंकर यांनी उपसभापतीपदासाठी अर्ज दाखल केला. विधानपरिषदेच्या पक्षीय बलाबलानुसार सचिन अहिर यांचा एकतर्फी विजय झाला.

## सबळ पुराव्यांच्या आधारे भीमराव कांबळेला मृत्यूदंड

**। पुणे ।** पुणे जिल्ह्यातील भोर तालुक्यातील नसरापूर येथे साडेतीन वर्षांच्या चिमुकलीवर अत्याचार करून तिची निर्घृण हत्या करणाऱ्या आरोपी भीमराव कांबळे याला विशेष न्यायालयाने अखेर फाशीची शिक्षा सुनावली. राज्यभर संतापाची लाट उसळलेल्या या प्रकरणात सीसीटीव्ही फुटेज, आरोपीचा कबुलीजबाब आणि पोलिसांनी सादर केलेले सबळ पुरावे निर्णायक ठरले.सीसीटीव्ही फुटेजमध्ये आरोपी भीमराव कांबळे चिमुकलीचा हात धरून नेत असल्याचे स्पष्ट दिसून आले. या महत्त्वपूर्ण पुराव्याच्या आधारे पोलिसांनी त्याला ताब्यात घेतले. चौकशीदरम्यान आरोपीने गुन्ह्याची कबुली दिली.

# उद्धव ठाकरेंची शिर्डीतील ‘गुगली’

**। मुंबई ।** शिर्डी दौऱ्यात उद्धव ठाकरेंनी केलेल्या एका विधानाने महाराष्ट्राच्या राजकारणात नव्या चर्चांना तोंड फुटले आहे. देवेंद्र फडणवीस देशाचे पंतप्रधान झाले तर त्यांना पाठिंबा देण्यात काहीच हरकत नाही, असे सांगत त्यांनी स्वतःला फडणवीसांचे हितचिंतकही म्हटले. हे विधान केवळ सौजन्याचे नव्हते, तर त्यामागे दूरगामी राजकीय रणनीती असल्याची चर्चा सुरू झाली आहे.

२०१९ नंतर दोन टोकांवर उभे असलेले उद्धव ठाकरे आणि देवेंद्र फडणवीस तातडीने एकत्र येतील असे दिसत नसले, तरी भविष्यातील राजकीय परिस्थिती पाहता तो पर्याय पूर्णपणे नाकारता येत नाही. उद्धव ठाकरेंसमोर आज सर्वात मोठे आव्हान म्हणजे पक्षातील होत असलेली गळती थांबवणे आणि पक्षाला पुन्हा उभारी देणे. त्यातच आदित्य ठाकरेंच्या मतदारसंघातील निकटवर्तीय नेत्याने महायुतीत प्रवेश केल्याने

### ▶ शिंदेंसाठी इशारा की नव्या राजकीय समीकरणांची चाहूल?

ठाकरेंना आणखी एक धक्का बसला आहे. याच पार्श्वभूमीवर ठाकरेंनी भाजपबाबत मवाळ भूमिका घेतल्याचे दिसते. त्यांच्या वक्तव्यातून त्यांनी थेट एकनाथ शिंदे आणि अजित पवार गटावर निशाणा साधला. त्याचवेळी फडणवीसांबद्दल सकारात्मक भूमिका घेत महायुतीमध्ये संशयाचे वातावरण निर्माण करण्याचाही प्रयत्न केल्याची चर्चा आहे. शिंदे-फडणवीस यांच्यात दुरावा निर्माण झाला, तर त्याचा सर्वाधिक राजकीय फायदा ठाकरे गटाला होऊ शकतो.

महाराष्ट्रातील व्यक्ती देशाचा पंतप्रधान होत असेल तर त्याला



पाठिंबा द्यायला काय हरकत आहे? असे म्हणत ठाकरेंनी मराठी अस्मितेचे कार्डही प्रभावीपणे वापरले. त्याचवेळी भाजपच्या केंद्रीय नेतृत्वावर अप्रत्यक्ष टीका करून त्यांनी फडणवीसांच्या विरोधातील अंतर्गत राजकारणाकडेही लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला. सध्या उद्धव ठाकरेंसमोर तीन प्रमुख पर्याय दिसतात. पहिला म्हणजे महाविकास आघाडीत राहून भाजपशी पडद्यामागून संबंध सुधारणे. दुसरा, भविष्यातील राजकीय परिस्थितीनुसार भाजपसोबत नव्या समीकरणांचा विचार करणे. आणि तिसरा, स्वतंत्रपणे पक्षबांधणी करत राज ठाकरे यांच्यासोबतच्या सहकार्याचा विस्तार करणे. दुसरीकडे, एकनाथ शिंदे यांची राजकीय ताकद मोठ्या प्रमाणावर भाजपच्या पाठिंब्यावर अवलंबून असल्याचेही बोलले जाते. भविष्यात भाजपची भूमिका बदलली, तर शिंदे गटासमोर मोठे राजकीय आव्हान उभे राहू शकते. त्यामुळे ठाकरे-फडणवीस यांच्यातील वाढती राजकीय जवळीक शिंदे गटासाठी चिंतेचा विषय ठरू शकते. गेल्या काही वर्षांत भाजपने अनेक अशक्य वाटणारी राजकीय समीकरणे शक्य करून दाखवली आहेत. त्यामुळे भविष्यात महाराष्ट्राच्या राजकारणात कोणतेही समीकरण अशक्य नाही, हेच वास्तव आहे. थोडक्यात, शिर्डीत उद्धव ठाकरेंनी टाकलेली ही 'गुगली' केवळ एका विधानापुरती मर्यादित नाही. ती महाराष्ट्राच्या राजकारणातील नव्या डावपेचांची सुरुवात ठरू शकते. या खेळात कोणाची विकेट पडणार आणि कोण बाजी मारणार, हे मात्र येणारा काळच ठरवेल.


## आंबेनळी घाटात दरड कोसळली

**। पोलादपूर ।** तालुक्यातील आंबेनळी घाटाच्या रुंदीकरणाच्या कामामुळे उभे कापण्यात आलेल्या डोंगरांनी आता पाऊस सुरू होताच लाल मातीचे ढिगारे घाट रस्त्यावर ढकलण्यास सुरुवात केली आहे. मंगळवारी संध्याकाळी सात वाजण्याच्या सुमारास पोलादपूर तालुक्यातील कुंभळवणे ते पायटे गावादरम्यान एका मोठ्या दगडासह लाल मातीचा ढिगारा आणि एक झाड अशी साधारणपणे वीस ते पन्नास मीटर अंतराची दरड कोसळली. दरम्यान, पावसाळा सुरू झाल्यापासून पोलादपूर तालुक्यात तीन दिवस शंभरी पार पाऊस पडल्याची नोंद तसीसल कार्यालयातील आपत्ती निवारण कक्षातून प्राप्त झाली आहे.

### रेवस येथे डिझेल तस्करी प्रकरण

## तिन्ही आरोपींना तीन दिवसांची पोलीस कोठडी

**। अलिबाग ।** अलिबाग तालुक्यातील रेवस जेटीजवळ नवघर गावाच्या हद्दीतील समुद्रकिनाऱ्यावर बेकायदेशीर डिझेल तस्करीप्रकरणी अटक करण्यात आलेल्या तिन्ही आरोपींना न्यायालयाने तीन दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे. या प्रकरणात सागरी पोलिसांनी सुमारे १४ लाख ५६ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला असून, डिझेलचा साठा नेमका कुठून आणण्यात आला आणि तो कुठे विक्रीसाठी नेण्यात



येणार होता, याचा तपास सुरू आहे. मांडवा सागरी पोलिसांनी रविवारी (२९ जून) सकाळी रेवस **(पान ३ वर)**

## गैरसमजुतीतून दूर झालेले कार्यकर्ते पुन्हा शेकापक्षात प्रवेश




**। अलिबाग ।** गोविंद बंदर परिसरातील काही कार्यकर्त्यांनी गैरसमजुतीतून चार दिवसांपूर्वी शिवसेना (ठाकरे गट) गाठला होता. मात्र हा राजकीय निर्णय अल्पकाळ टिकला आणि गैरसमज दूर होताच संबंधित कार्यकर्त्यांनी कुटुंबीयांसह पुन्हा शेतकरी कामगार पक्षात प्रवेश केला. त्यामुळे अलिबागचे माजी नगराध्यक्ष तथा विद्यमान बांधकाम सभापती प्रशांत नाईक यांच्या नेतृत्वावरील कार्यकर्त्यांचा विश्वास पुन्हा अधोरेखित झाल्याचे स्पष्ट झाले आहे.

बुधवारी (दि. १) शेतकरी भवन येथील सभागृहात प्रशांत नाईक यांच्या उपस्थितीत हा पक्षप्रवेश सोहळा उत्साहात पार पडला. कार्यकर्त्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. यावेळी शेकाप महिला आघाडी प्रमुख ड. मानसी म्हात्रे, कामगार आघाडी प्रमुख प्रदीप नाईक, जिल्हा सहचिटणीस ड. गौतम पाटील, तालुका चिटणीस सुरेश घरत, माजी नगराध्यक्ष सतीश प्रधान, माजी नगरसेविका वृषाली ठोसर, संजना किर, महेश शिंदे, पाणी सभापती अनिल चोपडा, नगरसेविका सुषमा पाटील, ड. निवेदिता वाघमारे, ड. ऋषीकेश माळी, जमाल सय्यद, अलिबाग पुरोगामी युवक अध्यक्ष विक्रांत वार्डे यांच्यासह अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

इस्माईल मोहद्दीन सय्यद, सल्लाउद्दीन गायसुद्दीन शाह आणि कामरुद्दीन गयाउद्दीन शाह **(पान ३ वर)**

## संपादकीय

# पेपरफुटीचे सावट आणि महाराष्ट्राची शिक्षणव्यवस्था

महाराष्ट्र हे देशातील प्रगत आणि शैक्षणिकदृष्ट्या अग्रगण्य राज्य मानले जाते. मात्र अलीकडील काळात वारंवार समोर येणाऱ्या पेपरफुटीच्या घटनांनी या प्रतिमेला मोठा तडा दिला आहे. टीईटी, एमपीएससी, नीट, केईटी अशा विविध परीक्षांच्या प्रश्नपत्रिका फुटल्याच्या घटना केवळ प्रशासनाच्या अपयशाचे निदर्शक नाहीत, तर लाखो विद्यार्थ्यांच्या भविष्याशी खेळणाऱ्या गंभीर व्यवस्थात्मक संकटाचे प्रतीक आहेत.

ताज्या टीईटी पेपरफुटीच्या घटनेने पुन्हा एकदा संपूर्ण राज्य हादरले. परीक्षा होण्याच्या अवघ्या काही तास आधी प्रश्नपत्रिकेतील प्रश्न काही व्यक्तींकडे आढळल्याने परीक्षा रद्द करावी लागली. शिक्षक होण्याचे स्वप्न पाहणाऱ्या हजारो तरुणांनी महिनोन्महिने केलेला अभ्यास, घेतलेले कष्ट आणि खर्च केलेला पैसा एका क्षणात वाया गेला. ही केवळ परीक्षा रद्द होण्याची घटना नाही; तर विद्यार्थ्यांच्या मनोबलावर झालेला मोठा आघात आहे. गेल्या काही वर्षांचा आढावा घेतला, तर एमपीएससी पेपरफुटी, नीट परीक्षेतील गैरव्यवहार, केईटी प्रकरण आणि आता टीईटी या घटना एकाच धाग्याने जोडलेल्या दिसतात. प्रत्येक वेळी आरोपी पकडले जातात, चौकशी समित्या नेमल्या जातात, सरकार कठोर कारवाईची घोषणा करते; पण काही महिन्यांनी पुन्हा एखादी नवीन परीक्षा वादाच्या भोवऱ्यात सापडते. याचा अर्थ समस्या व्यक्तींची नाही, तर व्यवस्थेची आहे.

आज राज्य सरकार डिजिटल महाराष्ट्र, कृत्रिम बुद्धिमत्ता, ई-गव्हर्नन्स, आधुनिक तंत्रज्ञान अशा विषयांवर मोठमोठ्या घोषणा करत आहे. परंतु प्रश्न असा आहे की, एवढ्या तंत्रज्ञानाच्या युगात प्रश्नपत्रिका सुरक्षित ठेवण्यासाठी सक्षम यंत्रणा का उभी राहू शकत नाही? पेपर तयार करणारे अधिकारी, मुद्रण प्रक्रिया, वाहतूक, परीक्षा केंद्रे, कर्मचारी आणि मध्यस्थ या साखळीतील कुठेतरी गंभीर छिद्र आहे. त्या छिद्रातूनच प्रश्नपत्रिका बाहेर पडतात.

पेपरफुटीचा सर्वात मोठा फटका गरीब आणि मध्यमवर्गीय विद्यार्थ्यांना बसतो. ग्रामीण भागातील अनेक विद्यार्थी कर्ज काढून, नोकरी करत अभ्यास करून, घरची जबाबदारी सांभाळत स्पर्धा परीक्षांची तयारी करतात. त्यांच्यासाठी एक वर्षाचा कालावधी अत्यंत महत्त्वाचा असतो. परीक्षा रद्द झाली की त्यांचे वय, वेळ, पैसा आणि मानसिक ऊर्जा सर्व काही वाया जाते. दुसरीकडे, प्रश्नपत्रिका मिळवणारे काही मोजके लोक बेकायदेशीर मार्गाने पुढे जाण्याचा प्रयत्न करतात. ही परिस्थिती प्रामाणिक विद्यार्थ्यांमध्ये असंतोष आणि निराशा निर्माण करते. या पार्श्वभूमीवर टीईटी परीक्षेबाबतही प्रश्न उपस्थित होऊ लागले आहेत. अनेक शिक्षक संघटनांचे मत आहे की, शिक्षकांची गुणवत्ता तपासण्यासाठी पारदर्शक आणि विश्वासार्ह यंत्रणा उभी करणे आवश्यक आहे; अन्यथा वारंवार होणाऱ्या पेपरफुटीमुळे संपूर्ण प्रक्रियेवरील विश्वास उडत आहे. शिक्षणाचा दर्जा उंचावण्याऐवजी विद्यार्थ्यांना आणि शिक्षकांना संशयाच्या भोवऱ्यात ढकलले जात आहे. सरकारने आता केवळ आरोपी पकडण्यापलीकडे जाऊन मूलभूत सुधारणा करणे गरजेचे आहे. प्रश्नपत्रिका तयार करण्यापासून निकाल जाहीर होईपर्यंत प्रत्येक टप्प्यावर डिजिटल ट्रॅकिंग, एन्क्रिप्टेड प्रणाली, स्वतंत्र देखरेख यंत्रणा आणि कठोर जबाबदारी निश्चित करणे आवश्यक आहे. पेपरफुटीला आर्थिक गुन्ह्याइतकीच गंभीर शिक्षा दिली गेली पाहिजे. संबंधित अधिकारी आणि संस्थांची वैयक्तिक जबाबदारी निश्चित झाली, तरच भीती निर्माण होईल.

महाराष्ट्राच्या तरुणाईला आश्वासनांची नाही, तर विश्वासाची गरज आहे. स्पर्धा परीक्षा ही विद्यार्थ्यांच्या कष्टांची खरी कसोटी असली पाहिजे; नशीब, ओळखी किंवा लीक झालेल्या प्रश्नपत्रिकांची नव्हे. पेपरफुटीचे हे सावट दूर करण्यासाठी सरकारने तातडीने ठोस पावले उचलली नाहीत, तर शिक्षणव्यवस्थेवरील जनतेचा उरलेला विश्वासही ढासळण्याचा धोका आहे.

# अर्धवट पुलांवर वाहतूक, नव्या पुलाला खड्डे





## ▶ प्रवाशांच्या जीवाशी खेळ? ▶ मुंबई-गोवा महामार्गाची पोलखोल!

> “ माणगावच्या काळ नदीवरील नवीन पूल आठ दिवसांपूर्वीच वाहतूकीसाठी खुला करण्यात आला. पहिल्याच पावसात त्यावर खड्डे पडले आहेत. या पूलावरून वाहतूक तत्काळ बंद करावी आणि झालेल्या कामाची गुणवत्ता नियंत्रण यंत्रणेमार्फत सखोल चौकशी व्हायला हवी.
> - शर्मिला सुर्वे, नगराध्यक्षा माणगाव

**। अलिबाग ।** मुंबई-गोवा महामार्गाच्या चौपदरीकरणाच्या कामातील गंभीर त्रुटी पुन्हा एकदा समोर आल्या आहेत. एकीकडे कोलाड उड्डाण पुलावरील संरक्षण कठड्यांचे काम अपूर्ण असतानाच वाहतूक सुरू करण्यात आली आहे, तर दुसरीकडे माणगांव येथील काळ नदीवरील नव्याने बांधलेल्या पुलावर वाहतूक सुरू होऊन अवघे दहा दिवस होत नाहीत, तोच पहिल्याच पावसात पुलावर खड्डे पडू लागले आहेत. त्यामुळे महामार्गावरील कामाच्या गुणवत्तेवर आणि प्रशासनाच्या निर्णयक्षमतेवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून प्रवाशांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

कोलाड येथील सुमारे ५० ते ६० फूट उंच उड्डाण पुलाच्या दोन्ही बाजूंना अनेक ठिकाणी संरक्षण कठड्यांऐवजी केवळ लोखंडी सळ्या उभ्या दिसत आहेत. इतक्या उंच पुलावर अपघात झाल्यास वाहन थेट खाली कोसळण्याची भीती व्यक्त होत आहे. सुरक्षा उपाययोजना पूर्ण होण्यापूर्वीच वाहतूक सुरू करून प्रशासन प्रवाशांच्या जीवाशी खेळत असल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे.

# वहिवाट रस्ता बंद करण्याचा डाव हाणून पाडणार



## ▶ चौल-पाझर संघर्ष समितीचे तहसीलदारांना निवेदन

> “ शेतकऱ्यांचा पूर्वापार चालत आलेला वहिवाट हक्क कोणत्याही परिस्थितीत हिरावून घेऊ दिला जाणार नाही. प्रशासनाने तातडीने हस्तक्षेप करून रस्ते आणि नैसर्गिक पाण्याचे मार्ग संरक्षित करावेत. अन्यथा शेतकऱ्यांच्या हक्कांसाठी कायदेशीर तसेच लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन छेडले जाईल.
> - चौल-पाझर संघर्ष समिती, चौल

**। चौल ।** अलिबाग तालुक्यातील चौल-पाझर येथील शेतकऱ्यांच्या पूर्वापार वापरात असलेला बैलगाडी मार्ग, पाऊलवाट आणि पावसाळी पाण्याचे नैसर्गिक मार्ग अबाधित ठेवावेत, अन्यथा शेकडो शेतकऱ्यांवर अन्याय होईल, अशी मागणी करत चौल-पाझर संघर्ष समितीने सोमवारी (दि. २९) तहसीलदार विक्रम पाटील यांना निवेदन सादर केले. समितीच्या म्हणण्यानुसार, लिबेरा डेव्हलपर्स प्रा. लि.ने चौल-पाझर हद्दीतील अनेक शेतजमिनी खरेदी केल्या आहेत. मात्र, या जमिनींमधून स्थानिक शेतकऱ्यांचा अनेक दशकांपासून सुरू असलेला वहिवाट हक्क, पारंपरिक बैलगाडी रस्ता आणि पाऊलवाट अस्तित्वात असल्याची हरकत कंपनीला यापूर्वीच लेखी स्वरूपात देण्यात आली होती. तरीही या हरकतींचा विचार न करता कंपनीने खरेदी व्यवहार सुरूच ठेवल्याचा आरोप समितीने केला आहे.

यापूर्वी २०१९ आणि २०२४ मध्येही कंपनीला व त्यांच्या वकिलांना लेखी हरकती व कायदेशीर नोटीस बजावून वहिवाट हक्क कायम ठेवण्याची मागणी करण्यात आली होती. मात्र, त्यावर कोणतीही ठोस कार्यवाही किंवा उत्तर मिळाले नसल्याचा दावा निवेदनात करण्यात आला आहे. यामुळे तहसीलदार विक्रम पाटील यांनी तातडीने हस्तक्षेप करून शेतकऱ्यांचा पारंपरिक वहिवाट हक्क, बैलगाडी रस्ता, पाऊलवाट तसेच पावसाळी पाण्याचे नैसर्गिक मार्ग कायम राखण्यासाठी संबंधित कंपनीला स्पष्ट सूचना द्याव्यात आणि भविष्यात कोणताही अडथळा निर्माण होणार नाही, याची खात्री करावी, अशी मागणी उपस्थित शेतकऱ्यांनी केली आहे.

# पल्स पोलिओ मोहिमेला उत्स्फूर्त प्रतिसाद



## ▶ १.५९ लाख बालकांना लसीकरण

**। अलिबाग ।** राष्ट्रीय पल्स पोलिओ लसीकरण मोहिमेंतर्गत रविवारी (ता. २८) रायगड जिल्ह्यात उत्साहात लसीकरण मोहीम राबविण्यात आली. या मोहिमेत ० ते ५ वर्षे वयोगटातील १ लाख ५९ हजार ८३२ बालकांना पोलिओ प्रतिबंधक लसीचे दोन थेंब पाजण्यात आले. यापैकी जिल्हा परिषद आरोग्य विभागामार्फत १ लाख ४३ हजार ९२४, तर जिल्हा सामान्य रुग्णालयामार्फत १५ हजार ९०८ बालकांचे लसीकरण करण्यात आले. जिल्हाभरात २ हजार ३४१ लसीकरण बूथ उभारण्यात आले होते. कोणतेही बालक लसीकरणापासून वंचित राहू नये, यासाठी पुढील काही दिवस आशा स्वयंसेविका, आरोग्य कर्मचारी आणि अंगणवाडी सेविका घरभेटी देऊन लसीकरण करतील. तसेच स्थलांतरित कुटुंबे, बांधकाम मजूर, वीटभट्ट्या, बस व रेल्वे स्थानके तसेच दुर्गम भागांमध्ये विशेष पथकांमार्फतही लसीकरण केले जाणार आहे. मोहिमेचा शुभारंभ जिल्हा परिषद अध्यक्ष मंगेश वाकडीकर, उपाध्यक्ष मधुकर पाटील, जिल्हाधिकारी किशन जावळे तसेच विविध लोकप्रतिनिधी व आरोग्य अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत जिल्ह्यातील विविध केंद्रांवर झाला. या मोहिमेच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी आरोग्य विभाग, आशा सेविका, अंगणवाडी सेविका व सर्व कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

# राजिप महिला व बालकल्याण समितीचा अभ्यास दौरा

। अलिबाग । रायगड जिल्हा परिषद महिला व बालकल्याण समितीचा तीन दिवसीय अभ्यास दौरा २५ ते २७ जूनदरम्यान रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यात यशस्वीरित्या पार पडला. या दौ-यादरम्यान समितीच्या सदस्यांनी अंगणवाड्या, ग्रामपंचायती, प्राथमिक आरोग्य केंद्रे तसेच विविध शासकीय संस्थांना भेटी देऊन महिला व बालविकास, आरोग्य आणि ग्रामविकास क्षेत्रातील नावीन्यपूर्ण उपक्रमांची पाहणी केली.

दौ-यात रत्नागिरी जिल्ह्यातील नाचणे ग्रामपंचायत येथे राबविण्यात येणा या विविध विकासात्मक उपक्रमांना भेट देण्यात आली. ग्रामपंचायतीच्या लोकसहभागातून राबविण्यात येणा-या स्वच्छता, महिला सक्षमीकरण, बालविकास आणि




ग्रामविकासाच्या विविध उपक्रमांची माहिती समितीने घेतली व त्यांचे कौतुक केले. सिंधुदुर्ग जिल्ह्यातील भेटीदरम्यान सिंधुदुर्ग जिल्हा परिषद महिला व बालकल्याण सभापती तसेच समितीचे इतर सदस्य उपस्थित होते. दोन्ही जिल्ह्यांतील महिला व बालकल्याण विभागाच्या कामकाजाबाबत अनुभवांची देवाणघेवाण करण्यात आली.

विविध नावीन्यपूर्ण उपक्रमांचा अभ्यास करून ते रायगड जिल्ह्यात प्रभावीपणे राबविण्याबाबत सकारात्मक चर्चा झाली. या अभ्यास दौ-यामुळे महिला व बालकल्याण, आरोग्य सेवा आणि ग्रामविकास क्षेत्रातील उत्कृष्ट कार्यपद्धतींचा अभ्यास करून त्या रायगड जिल्ह्यात राबविण्यास निश्चितच मदत होणार असल्याचा विश्वास समिती सदस्यांनी व्यक्त केला. अभ्यास दौर्यात महिला बालकल्याण सभापती रसिका केणी, समिती सदस्या मानसी दळवी, सुवर्णा ठाकरे, स्मिता पाटील, विजया पाशिलकर, उर्वशी वाडकर, वर्षा दोरे, मनाली काळींजकर व समिती सचिव तथा जिल्हा कार्यक्रम अधिकारी महिला बालविकास निर्मला कुचिक यांनी सहभाग घेतला.

## १०१ विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप




। अलिबाग । ग्रामीण व दुर्गम भागातील विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाची गोडी निर्माण व्हावी आणि त्यांना प्रोत्साहन मिळावे, या उदात्त हेतूने 'एकता इंटरप्रायझेस मुंबई' आणि 'कलारंग सांस्कृतिक सामाजिक संस्था अलिबाग' यांच्या संयुक्त विद्यमाने एका विशेष सामाजिक उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या उपक्रमांतर्गत रायगड जिल्हा परिषदेच्या उमटे शाळेमध्ये एक मुख्य कार्यक्रम घेऊन एकूण ८० तर चिखली येथे २१ असे एकूण १०१ विद्यार्थ्यांना दप्तर व शालेय साहित्याचे वितरण करण्यात आले. 'एकता इंटरप्रायझेस'च्या संचालिका एकता म्हात्रे व निखिलेश म्हात्रे यांच्या माध्यमातून हा मोलाचा मदतीचा हात देण्यात आला.

या कार्यक्रमाचे मुख्य वैशिष्ट्य म्हणजे, केंद्र शाळा बापळे फणसापूर अंतर्गत येणाऱ्या बापळे फणसापूर, रामराज, उमटे, मोरोंडे, महान, खैरवाडी, जांभूळवाडी, गंगेचीवाडी आणि बारशेत या आजूबाजूच्या शाळांतील आदिवासी बहुल विभागातील ८० विद्यार्थ्यांना येथे एकत्र आणून साहित्याचे वाटप करण्यात आले. सोबतच, रा. जि. प. च्या चिखली शाळेतील २१ विद्यार्थ्यांनाही शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले. याप्रसंगी आपले मनोगत व्यक्त करताना केंद्र प्रमुख श्री. प्रमोद भोपी यांनी ग्रामीण भागातील विशिष्ट आदिवासी बहुभागातील विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वितरण करून खऱ्या अर्थाने त्यांच्यामध्ये शिक्षणाविषयीची आवड आणि प्रोत्साहन निर्माण केल्याबद्दल एकता म्हात्रे व निखिलेश म्हात्रे यांचे विशेष आभार व्यक्त केले. त्याचप्रमाणे कलारंग संस्थेचे अध्यक्ष प्रकल्प वाणी यांनी एकता इंटरप्राईजेसचे आभार मानत, शालेय विद्यार्थ्यांना अन्य उपक्रमांच्या माध्यमातून कसा बौद्धिक विकास करता येऊ शकेल याकरिता आगामी काळात विविध सांस्कृतिक उपक्रम राबवण्याचा प्रयत्न करू असे सांगितले.

## अलिबाग ज्येष्ठ नागरिक संस्थेची सभा

। अलिबाग । अलिबाग ज्येष्ठ नागरिक संस्थेची त्रैमासिक सभा रविवारी (दि.२८) रोजी जनरल अरुण कुमार वैद्य हायस्कूलच्या सभागृहात दुपारी २-३० वाजता आयोजित करण्याचा आली होती. यावेळी अलिबागमधील सनदी लेखापाल संजय राऊत हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. त्यांनी सध्या व्यवहारांमध्ये फसवणुकीचे प्रकार वाढले असून सायबर गुन्ह्यांची प्रकरणे ही वाढत असून त्यासाठी जेष्ठांनी आपल्या मोबाईलचा वापर करताना कसे सावध राहावे याबाबत मार्गदर्शन केले.

यावेळी संस्थेच्या ज्या सभासदांनी आपल्या वयाची ९० वर्षे ८० वर्षे व ७५ वर्षे पूर्ण केली आहेत, अशा सभासदांचे अभिष्टचिंतन करण्याचा आले. त्यात विजयकुमार शिंदे, अनंत पाटील, सखाराम पाटील, दत्ताराम म्हात्रे, सुनीता सुतार व सुषमा सोमण यांचा संस्थेतर्फे सन्मान करण्यात



आला. या कार्यक्रमास अध्यक्ष प्रफुल्ल राऊत, उपाध्यक्ष चारुशीला कोरडे, सचिव नंदू तळकर, सहसचिव मेघना कुलकर्णी व कार्यकारणी सदस्य आरके घरत, पुरुषोत्तम साठे, दिलीप शिंदे, राजाराम भगत, हेमंत राऊत, के. डी. पाटील, सुरेखा कोलते, विजया म्हात्रे, प्रतिभा पाठक, मिलिंद सुळे, तसेच सर्वश्री द्वा वा. नाईक, शरद कोरडे, कुसुम पाटील, शुभांगी आंब्रे हे सदस्य उपस्थित होते

## रायगडमध्ये पर्यटनाला नवी भरारी

। अलिबाग । रायगड जिल्ह्यातील पर्यटनाला नवे बळ देणाऱ्या पाच महत्त्वाकांक्षी रोप-वे प्रकल्पांना मंजुरी मिळाली असून, या प्रकल्पांमुळे जिल्ह्यातील ऐतिहासिक, धार्मिक आणि नैसर्गिक पर्यटनस्थळांपर्यंत पोहोचणे अधिक सोयीचे होणार आहे. राज्य शासनाच्या या निर्णयामुळे रायगडमधील पर्यटन विकासाला मोठी गती मिळण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

मंजूर झालेल्या प्रकल्पांमध्ये घारापुरी (एलिफंटा) लेणी, अलिबाग किनारा ते कुलाबा किल्ला, नेरळ ते माथेरान, रायगड किल्ल्याचा पायथा ते रायगड किल्ला आणि अलिबागमधील श्री क्षेत्र कनकेश्वर डोंगर या महत्त्वाच्या स्थळांचा समावेश आहे. हे सर्व प्रकल्प सार्वजनिक वाहतूक, पर्यटन आणि स्थानिक विकासाच्या दृष्टीने महत्त्वाचे मानले जात आहेत.केंद्र सरकारच्या पर्वतमाला अंतर्गत महाराष्ट्रात दुर्गम डोंगराळ गर्दीच्या पर्यटन स्थळांना जोडण्यासाठी ४५ हून अधिक प्रकल्प प्रस्तावीत आहेत. यापैकी १६ प्रकल्प राज्य सरकार स्वतः साकारणार असून उर्वरीत २९ प्रकल्प केंद्र सरकारच्या माध्यमातून पीपीपी तत्वावर उभारले जाणार आहेत.

अलिबाग समुद्र किनाऱ्यापासून कुलाबा किल्ल्यापर्यंत रोप-वे सुरू झाल्यास भरती-ओहोटीवर अवलंबून राहण्याची गरज कमी होईल आणि पर्यटकांना वर्षभर सुरक्षित व जलद प्रवासाची सुविधा उपलब्ध होईल. रायगड किल्ल्याच्या पायथ्यापासून गडावर जाणाऱ्या रोप-वेमुळे ज्येष्ठ नागरिक, दिव्यांग आणि लहान मुलांसह पर्यटकांना मोठा दिलासा मिळणार आहे. नेरळ-माथेरान रोप-वे प्रकल्पामुळे माथेरानपर्यंतचा प्रवास अधिक जलद व सुलभ होणार असून, कनकेश्वर डोंगरासाठीचा रोप-वे धार्मिक पर्यटनाला चालना देणारा ठरणार आहे. तसेच घारापुरी लेणीपर्यंतच्या रोप-वे प्रकल्पामुळे जागतिक वारसा स्थळाला भेट देणाऱ्या देशी-विदेशी पर्यटकांची संख्या वाढण्याची अपेक्षा आहे.या प्रकल्पांच्या अंमलबजावणीनंतर पर्यटन क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर रोजगारनिर्मिती, स्थानिक व्यवसायांना चालना, हॉटेल, वाहतूक आणि अन्य सेवा क्षेत्रांचा विकास होण्याची शक्यता आहे. त्यामुळे रायगड जिल्हा पर्यटनाच्या नकाशावर अधिक प्रभावीपणे झळकणार असल्याचे मत पर्यटन क्षेत्रातील जाणकार व्यक्त करत आहेत. प्रकल्पांच्या पुढील टप्प्यात सविस्तर आराखडा, पर्यावरणीय मंजुरी, तांत्रिक प्रक्रिया आणि प्रत्यक्ष कामांची निविदा प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर बांधकामाला सुरुवात होणार आहे.

पान १ वरुन

### तिन्ही आरोपींना तीन दिवसांची पोलीस कोठडी

जेटीजवळील समुद्रकिनाऱ्यावर छापा टाकून दोन मासेमारी बोटींसह मोठ्या प्रमाणात अवैधरित्या साठवलेले डिझेल जप्त केले. मासेमारी बोटींचा वापर करून विनापरवाना डिझेलची वाहतूक व विक्री करण्याचा प्रकार उघडकीस आला. या कारवाईत गजानन यशवंत कोळी (३८), अनिल शंकर कोळी (३८, दोघेही रा. सुरकीचा पाडा, करंजा, ता. उरण) आणि योगेश जनार्दन पाटील (३२, रा. करंजा, ता. उरण) यांना अटक करण्यात आली. पोलिसांनी 'वाघेश्वरी साई' आणि 'एमएफबीआई गुरू माऊली' या दोन मासेमारी बोटी जप्त केल्या. त्यापैकी एका बोटीत सुमारे ३ हजार ५०० लिटर अवैध डिझेल आढळून आले असून, त्याची किंमत सुमारे ३ लाख ५० हजार रुपये आहे. याशिवाय सुमारे ५ लाख रुपये किमतीची दुसरी बोट आणि इतर साहित्य असा एकूण १४ लाख ५६ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. दरम्यान, तिन्ही आरोपींना न्यायालयात हजर करण्यात आले असता, पुढील तपासासाठी न्यायालयाने त्यांना तीन दिवसांची पोलीस कोठडी (रिमांड) मंजूर केली. या प्रकरणामागील डिझेल तस्करीचे जाळे, संबंधित इतर व्यक्तींचा सहभाग आणि इंधनाचा स्रोत याचा सखोल तपास मांडवा सागरी पोलीस करत आहेत.

### गैरसमजुतीतून दूर झालेले कार्यकर्ते पुन्हा शेकापक्षात प्रवेश

यांनी चार दिवसांपूर्वी गैरसमजुतीमधून शिवसेना (ठाकरे गट) प्रवेश केला होता. मात्र प्रशांत नाईक यांच्याशी चर्चा झाल्यानंतर गैरसमज दूर झाले आणि त्यांनी आपल्या कुटुंबीयांसह पुन्हा शेतकरी कामगार पक्षात प्रवेश करण्याचा निर्णय घेतला. पक्षात पुनरागमन करताना त्यांनी शेकापशी असलेली आपली जुनी नाळ कायम असल्याची भावना व्यक्त केल्याचे पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले.

या घरवापसीकडे केवळ पक्षप्रवेश म्हणून नव्हे, तर प्रशांत नाईक यांच्या सातत्यपूर्ण जनसंपर्क, कार्यकर्त्यांशी असलेले वैयक्तिक नाते आणि संघटनात्मक नेतृत्वावर पुन्हा उमटलेला विश्वास म्हणून पाहिले जात आहे. त्यामुळे अलिबाग शहरातील राजकीय समीकरणांमध्ये या घडामोडीची चर्चा सुरू झाली आहे.

# आगरकोट किल्ल्याच्या ‘वनबुरुज’ला नवे आयुष्य

## केंद्रीय पुरातत्त्व विभागाकडून शास्त्रोक्त संवर्धन सुरू

**। अलिबाग ।** तालुक्यातील ऐतिहासिक रेवदंडा आगरकोट किल्ल्याच्या उत्तर प्रवेशद्वारावरील 'वन बुरुज'च्या शास्त्रोक्त संवर्धनाचे काम केंद्रीय पुरातत्त्व विभागाकडून वेगाने सुरू आहे. जीर्णावस्थेत पोहोचलेल्या या महत्त्वाच्या वास्तूची दुरुस्ती आणि डागडुजी पारंपरिक तंत्रज्ञान व पुरातत्त्वीय निकषांनुसार करण्यात येत असून, त्यामुळे किल्ल्याच्या ऐतिहासिक वारशाला नवसंजीवनी मिळणार आहे.

सोळाव्या शतकात पोर्तुगीजांनी उभारलेल्या आगरकोट किल्ल्याच्या या भव्य प्रवेशद्वाराने अनेक ऐतिहासिक घटनांचा साक्षीदार म्हणून काळाचा प्रवास अनुभवला आहे. मात्र, पावसाचा सततचा मारा, वाढलेली झाडे आणि नैसर्गिक झीज यामुळे प्रवेशद्वारावरील दगडी बांधकाम, पोर्तुगीज सत्तेचे प्रतीक असलेले क्राऊन शिल्प, दगडी कमान आणि कोरीव भाग मोठ्या प्रमाणात खराब झाले होते. त्यामुळे या वास्तूच्या संवर्धनाची गरज निर्माण झाली होती



पुरातत्व विभागाचे रेवदंडा संरक्षण सहाय्यक बजरंग येळीकर यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यानंतर केंद्रीय पुरातत्त्व विभागाच्या मुंबई मंडळाचे अधीक्षक डॉ. अभिजित आंबेकर यांच्या मार्गदर्शनाखाली हे काम हाती घेण्यात आले आहे.

अत्यंत काळजीपूर्वक दगडी बांधकाम मजबूत केले जात असून, मूळ स्थापत्याची वैशिष्ट्ये आणि ऐतिहासिक ओळख अबाधित राहील याची विशेष दक्षता घेतली जात आहे.

संवर्धनामध्ये प्रवेशद्वारावरील पोर्तुगीज क्राऊन शिल्प, तटबंदी, शिलालेख, दगडी कमान तसेच अन्य कोरीव स्थापत्य घटकांचे संरक्षण करण्यावर भर देण्यात आला आहे. आधुनिक दुरुस्तीऐवजी पारंपरिक साहित्य आणि शास्त्रोक्त पद्धतींचा वापर करून मूळ वास्तुरूप कायम राखण्याचा प्रयत्न केला जात आहे.

इतिहास अभ्यासकांच्या मते, किल्ल्यांची प्रवेशद्वारे ही केवळ दगडी रचना नसून तत्कालीन लष्करी रणनीती, स्थापत्यकौशल्य आणि सांस्कृतिक वैभवाची साक्ष देणारी स्मारके आहेत. त्यामुळे अशा वास्तूंचे संवर्धन हा ऐतिहासिक वारसा जतन करण्याच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा उपक्रम मानला जात आहे. संवर्धनाचे काम पूर्ण झाल्यानंतर रेवदंडा आगरकोट किल्ल्याचा 'वन बुरुज' नव्या रूपात इतिहासप्रेमी, पर्यटक आणि संशोधकांसाठी आकर्षणाचे केंद्र ठरण्याची अपेक्षा असून, रेवदंड्याच्या ऐतिहासिक ओळखीला त्यातून नवे बळ मिळणार आहे.

# कर्करोग तपासणीसाठी फिरत्या मोबाईल व्हॅनची सुविधा



**। अलिबाग ।** रायगड जिल्ह्यात कर्करोगाच्या तपासणीसाठी जिल्हा सामान्य रुग्णालयातर्फे फिरत्या मोबाईल व्हॅनची सोय करण्यात आली आहे. या व्हॅनमध्ये कर्करोगाच्या तपासण्या, विशेषतः स्तनाच्या कर्करोगासाठी तपासणी केली जाते. जुलै महिन्यांत रायगड जिल्ह्यामध्ये या व्हॅनच्या माध्यमातून नागरिकांची तपासणी करण्यात येणार आहे. या व्हॅनच्या माध्यमातून नागरिकांनी कॅन्सरसंबंधीच्या तपासण्या करण्याचे आवाहन जिल्हा रुग्णालयातर्फे करण्यात आले आहे. महाराष्ट्रात आढळणा-या प्रमुख तीन कर्करोग प्रकारांमध्ये मुख कर्करोग, स्तनाचा कर्करोग आणि गर्भाशय मुखाचा कर्करोग सर्वाधिक रुग्ण नोंदवले जात आहेत. या पार्श्वभूमीवर नागरिकांसाठी ही मोहीम मोफत राबवण्यात येत आहे. शासनाच्या माध्यमातून उपलब्ध करण्यात आलेल्या विशेष कर्करोग तपासणी वाहनामध्ये डेंटल चेअर, गर्भाशय, मुख तपासणीसाठी आवश्यक बेड, तसेच विविध वैद्यकीय साधनसामग्री उपलब्ध आहे. या वाहनाच्या साहाय्याने नागरिकांची शारीरिक तपासणी करून संशयित रुग्णांची नोंद केली जात आहे. ही व्हॅन जिल्ह्यातील उपकेंद्र, प्राथमिक आरोग्य केंद्रांत जाउन तपासणी शिबिर घेतले जाते. शिबिरांतून मुख कर्करोगासाठी तज्ज्ञ डॉक्टरांकडून तपासणी आणि आवश्यक असल्यास ओरल बायोप्सी, स्तन कर्करोगासाठी क्लिनिकल तपासणी आणि मेमोग्राफीसाठी रुग्णालयात विनामूल्य संदर्भ, गर्भाशय मुख कर्करोगासाठी तपासणी आणि पॅप स्मीअर चाचणी केली जात आहे.

# टोरंट प्रकल्पविरोधात तहसिलदारांना निवेदन

**। कर्जत ।** कर्जत तालुक्यात होऊ घातलेला टोरंट जलविद्युत प्रकल्प रद्द करण्यात यावा, अशी मागणी शिवसेना ठाकरे गटाच्या महिला आघाडीच्यावतीने करण्यात आली आहे. याबाबतचे निवेदन त्यांनी तहसीलदार आणि प्रांत अधिकारी यांना दिले आहे. तसेच, शासनाला जागे करण्यासाठी शिवसेनेच्या ठाकरे गटाचा महिला आघाडी तर्फे तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा संतप्त इशाराही यावेळी देण्यात आला. पर्यावरण ऱ्हास करणाऱ्या जलविद्युत प्रकल्पाला कर्जत तालुक्यातून हद्दपार करा आणि कर्जत तालुक्यातील प्रदूषण मुक्त वातावरण कायम ठेवा, अशी मागणी करणारे निवेदन शिवसेना ठाकरे गटाच्यावतीने करण्यात आले.

# हेटवणे कालवा पूल चोरी प्रकरणी मुख्य आरोपी मयुर ढेणे अटकेत



**। पेण ।** तालुक्यातील हेटवणे मध्यम प्रकल्पातील कालव्यावरील पुलांचे लोखंडी साहित्य चोरी व अपहार प्रकरणाचा उलगडा करण्यात पोलिसांना यश आले असून, या प्रकरणातील मुख्य आरोपी मयुर ढेणे याला अटक करण्यात आली आहे. आरोपीकडून मिळालेल्या माहितीनुसार या प्रकरणात एकूण नऊ जणांचा सहभाग असल्याचे तपासात समोर आले आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, या नऊ आरोपींपैकी चार जणांवर अपहाराचा, तर पाच जणांवर चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अपहार प्रकरणात संबंधित प्रकल्पातील सुपरवायझर व प्रोजेक्ट मॅनेजर यांचाही समावेश असल्याचे तपासातून निष्पन्न झाले आहे. चोरी प्रकरणात मयुर ढेणे याच्यासह आणखी पाच आरोपींचा सहभाग असून, उर्वरित चार आरोपींचा शोध पोलीस घेत आहेत.

तपासादरम्यान मयुर ढेणे याने कबुली दिली की, तो व त्याचे चार साथीदार सुटीच्या दिवशी गॅस कटरच्या साहाय्याने कालव्यावरील पुलांचे लोखंडी साहित्य कापून चोरी करत असत. या प्रकाराची माहिती त्यांनी ना ठेकेदार कंपनीला दिली, ना हेटवणे प्रकल्पातील अधिकाऱ्यांना. चोरी केलेले साहित्य खोपोली व खारपाडा परिसरात विकल्याचेही त्याने पोलिसांना सांगितले.

या कारवाईत पोलिसांनी सुमारे ५६ टन लोखंडी साहित्य हस्तगत केले असून, त्याची सध्याची बाजारपेठेतील अंदाजे किंमत सुमारे १७.९२ लाख रुपये असल्याचे सांगण्यात आले आहे. तसेच गुन्ह्यात वापरण्यात आलेली एक पिकअप गाडी आणि एक छोटा हत्ती वाहन जप्त करण्यात आले आहे.

# आंबा-काजू नुकसानभरपाईत दिरंगाई खपवून घेणार नाही



**▸ वैकुंठ पाटील यांचा अधिकाऱ्यांना इशारा**

**। अलिबाग ।** रायगड जिल्हा परिषदेच्या कृषी समितीची मासिक सभा मंगळवारी जिल्हाधिकारी कार्यालयात कृषी समितीचे सभापती वैकुंठ पाटील यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. बैठकीत खरीप हंगामाची तयारी, जिल्ह्यातील पावसाची स्थिती, पेरणीची प्रगती, खतांचा पुरेसा साठा, शासनाच्या विविध कृषी योजनांची अंमलबजावणी तसेच आंबा-काजू नुकसानभरपाई आणि फार्मर आयडी मोहिमेचा सविस्तर आढावा घेण्यात आला.

रायगड जिल्हाधिकारी कार्यालयाच्या राजस्व सभागृहात पार पडलेल्या या बैठकीत जिल्हा परिषदेच्या सेस निधीतून राबविण्यात येणाऱ्या विविध कृषी विकास कामांना मान्यता देण्यात आली. तसेच जिल्ह्यातील प्रगतशील शेतकऱ्यांचा शाल व सुपारीच्या रोपट्याने सन्मान करण्यात आला. यंदाच्या खरीप हंगामात जिल्ह्यात समाधानकारक पाऊस झाल्याने भात पेरणीला वेग आला असून बहुतांश तालुक्यांत पेरणीची कामे सुरू असल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली. काही भागात पावसात खंड पडल्याने शेतकऱ्यांनी पाण्याची उपलब्धता आणि पेरणीबाबत चिंता व्यक्त केली. खतांचा पुरेसा साठा उपलब्ध ठेवून कोणत्याही शेतकऱ्याला खतांसाठी भटकावे लागू नये, तसेच कृत्रिम टंचाई निर्माण करणाऱ्यांवर कठोर कारवाई करावी, असे निर्देश सभापती वैकुंठ पाटील यांनी अधिकाऱ्यांना दिले.

कोकणातील आंबा व काजू उत्पादक शेतकऱ्यांसाठी शासनाने जाहीर केलेली नुकसानभरपाई वेळेत वितरित व्हावी, यावर बैठकीत विशेष चर्चा झाली. पात्र शेतकऱ्यांना नुकसानभरपाई देण्यात कोणतीही दिरंगाई झाल्यास संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई केली जाईल, असा इशारा वैकुंठ पाटील यांनी दिला. शासनाच्या विविध योजनांचा लाभ घेण्यासाठी आवश्यक असलेल्या फार्मर आयडी नोंदणी मोहिमेला गती देण्याचे निर्देशही बैठकीत देण्यात आले.

THIS PERIODICAL IS PUBLISHED BY DHANANJAY ARVIND KAVTHEKAR FROM HOUSE NO.38, NEAR MARUTI MANDIR, MARATH ALI, RAMRAJ, RAIGARH, MAHARASHTRA-402203 ON BEHALF OF DHANANJAY ARVIND KAVTHEKAR EDITED BY DHANANJAY ARVIND KAVTHEKAR AND PRINTED BY VIJAY SHIVAJI WAREKAR, JAGRUTI PRINTERS, B-101, 1ST FLOOR, D.K.CROSS MARG, NEAR RANIBUAG, BYCULL SERVICE INDUSTRIAL ESTATE, MUMBAI, MAHARASHTRA-400027".
**EMAIL ID. - metroraigad@gmail.com**
MOB.NO. 9272720720